# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०२/०४/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपींना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बेला :— फिर्यादी/पिडीता यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अप. क्र. १५४/२२ कलम ३७६(५),५०६,३४.भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील पिडीत/फिर्यादी ही आपल्या शेळया मौजा जसापुर शेत शिवारात चारत असतांना यातील आरोपी नामे—१) सुभाष उर्फ मंत्री मारोती जुमनाके वय २६ वर्ष २) गौरव गजानन आडे वय २१ वर्ष दोन्ही रा. विखनी ता समुद्रपुर वर्धा यांनी संगनमत करून फिर्यादीचे तोंड दाबून ओढत बाजूला असलेल्या नाल्याजावळील झुडपात जबरदस्तीने नेऊन नमुद दोन्ही आरोपीतांनी आळीपाळीने जबरी संभोग केला. व गावात कोणाला सांगीतले तर जीवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पूजा गायकवाड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. जिल्हा सत्र न्यायाधीश कोर्ट क्र. १३ नागूर मॅडम यांचे कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक ०२/०४/२०२४ रोजी मा. जिल्हा सत्र न्यायाधीश कोर्ट क्र. १३ नागूर मॅडम यांनी वरील नमुद दोन्ही आरोपींना कलम ३७६(ड),३४ भादवि मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी १५०००/— रू. दंड. दंड न भरल्यास प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास तसेच कलम ५०६,३४ भादवि मध्ये प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी साईखेडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा /५२२ निलेश बिजवाड यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर